ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ — पुणें, बुधवार तारीख १४ मार्च, १९५६ — अंक ११

## विविध माहिती

**लोकनृत्याचा अनुबोधपट**— सौराष्ट्र संगीत नाटक ॲकॅडमी ह्या संस्थेनें राज्यांतील लोकनृत्य व लोकगीतें ह्यांची माहिती देणारा अनुबोधपट तयार करण्याचें ठरविलें आहे. सौराष्ट्रामधील लोकांच्या जीवनांत नृत्य आणि गीत ह्यांनीं किती महत्त्वाचा भाग व्यापला आहे, तें चित्रपटांत परिणामकारक रीत्या दाखविण्यांत येणार आहे. स्त्रियांचीं वस्त्राभरणें व दागिने ह्यांचीहि माहिती चित्रपटांत दाखविली जाईल.

**गौतमी नदीवरील पूल**— राजमहेंद्रीपासून २० मैलांवर गौतमी नदीवर बांधण्यांत येणाऱ्या पुलाच्या कामास प्रारंभ करण्यांत आला आहे. पुलाची लांबी १। मैल होईल आणि तो बांधण्यास ४ वर्षांचा अवधी लागेल. पुलासाठी सुमारें १२५ लाख रुपये खर्च येईल. आंध्र सरकार राज्यांतील विकासाच्या कामासाठी भारतीय सरकारकडून कर्जाऊ रकमा घेत आहे.

**सरकारी नोकरांच्या पगारांतील तफावत**— बिहारच्या विधानसभेंतील एका विरोधी पक्षाच्या सभासदानें अशी सूचना केली कीं सरकारी नोकरांचे कमाल व किमान पगार अनुक्रमें १००० रुपये व १०० रुपये असे असावे. देशांत राष्ट्रीय पुनर्घटनेचें काम चालूं असतां ह्या फरकाचें प्रमाण कमी करणें अव्यवहार्य होईल, असें उत्तर सरकारतर्फे देण्यांत आलें.

**सेन-रॅले सायकलींचा कारखाना**— पुढील पांच वर्षांत सायकलींचें उत्पादन दरसाल २,००,००० पर्यंत वाढविण्याचें उद्दिष्ट सेन-रॅले सायकलीच्या कारखान्याच्या चालकांनीं जाहीर केलें आहे. कंपनीचा कारखाना सध्यां असनसोल येथें असून त्यांत दरसाल १,००,००० सायकली तयार होतात. उत्पादनाच्या किंमती वाढत असल्यामुळें सायकलींच्या किंमती घसरण्याची शक्यता मात्र फारशी नाहीं.

**तेल शुद्ध करण्याचा कारखाना**—खनिज तेल शुद्ध करण्याचा पांचवा कारखाना कलकत्ता येथें उभारण्यांत यावा अशी सूचना आसाम ऑईल कंपनीनें भारतीय सरकारला केली आहे. सध्यां दिग्बोई येथें एक, विजगापट्टम् येथें एक, आणि मुंबई जवळील ट्रॉम्बे बेटांत दोन, असे एकूण ४ कारखाने आहेत.

**प्राप्तीवरील कराची थकबाकी**—अहमदाबाद शहरांतील ३०० नागरिकांकडून यावयाची प्राप्तीवरील कराची रक्कम अद्याप वसूल झालेली नाहीं. सर्वांकडून सुमारें ९९ लाख रुपयांची रक्कम येणें आहे. ह्या कामासाठी एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली असून मालमत्तेची विक्री करून कर वसूल करण्यांत येत आहे, असें समजतें.

**बेअरिंग सामुद्रधुनीवर पूल**—बेअरिंग सामुद्रधुनीवर पूल बांधून उत्तर अमेरिका व आशिआ ह्यांचा संबंध जोडण्याची कल्पना रशिआकडून सुचविण्यांत आली आहे. ह्या कामासाठी अमेरिकन एंजिनिअर्सबरोबर चर्चा करण्याची तयारीहि दाखविण्यांत आली आहे. सामुद्रधुनी ५० मैल रुंद असून सुमारें १५० फूट खोल आहे.

**रशिआकडून पोलादाचा पुरवठा**—१९५६ सालांत रशिआकडून भारताला ५४,००० टन पोलादाचा माल पुरविण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत भारताला १० लाख टन पोलाद पुरविण्याविषयीं सध्यां उभयतां देशांच्या प्रतिनिधींमध्यें वाटाघाटी चालू आहेत.

**डच भांडवलदाराकडून भांडवल**—कांहीं डच कारखानदारांनीं भारतीय कंपन्यांत भारतांत भांडवल गुंतविण्यासंबंधी वाटाघाटी चालू आहेत. त्या यशस्वी झाल्यास, चालू वर्षांत भारतांत ४ कोटी रुपयांचें डच भांडवल गुंतविलें जाईल. रेल्वेला लागणारें सामान, रेडिओ, शास्त्रीय उपकरणें, इत्यादि माल उत्पन्न करणाऱ्या कारखान्यांत भांडवल घालण्यास डच भांडवलदार तयार आहेत.

**दुर्गापूर येथील पोलादाचा कारखाना**— पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथें ब्रिटनच्या मदतीनें, दरसाल १० लाख टन पोलाद निर्माण करणारा कारखाना काढण्यांत येत आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी लॅझर्ड ब्रदर्स ह्या ब्रिटिश कंपनीनें भारतीय सरकारला १·१५ कोटी पौंडांचें कर्ज देवविण्याची व्यवस्था केली आहे. हें कर्ज देण्याचें काम ब्रिटनमधील ५ बँका करणार आहेत.

**मध्यप्रदेशांत साखरेचा कारखाना**— मध्य प्रदेशांतील बैतुल, जबलपूर व हुशंगाबाद ह्या जिल्ह्यांतील उसाच्या लागवडीची पहाणी करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या भागांत एखाद्या सोइस्कर ठिकाणीं साखरेचा कारखाना काढण्याचा सरकारचा विचार आहे. सहकारी तत्त्वावर साखरेचा कारखाना काढण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत राज्याला २५ लाख रुपये मिळणार आहेत.

**खोबरेल तेलावरील कर**—इंडिअन सेंट्रल कोकोनट कमिटीची २३ वी बैठक अर्णाकुलम येथें भरली होती. सध्यां खोबऱ्याच्या धंद्याची परिस्थिति वाईट असल्यामुळें खोबरेल तेलावर दर टनामागें बसविण्यांत आलेला ७० रुपयांचा अबकारी कर रद्द करण्यांत यावा, अशी मागणी करणारा ठराव कमिटीनें मंजूर केला आहे.

**ब्रिटनमधील वीज-केंद्रांचा अभ्यास**—रशिआचे माजी मुख्य प्रधान मि. जॉर्जी मॅलेन्कॉव्ह लौकरच ब्रिटममधील दौऱ्यावर जाणार आहेत. पंतप्रधानाच्या जागेचा राजिनामा दिल्यावर त्यांना विद्युत्पादनाचे मंत्री नेमण्यांत आलें होतें. त्यांच्या नेतृत्वाखाली जाणारें रशिअन प्रतिनिधिमंडळ ब्रिटनमधील वीज-केंद्रांचा अभ्यास करणार आहे. दौरा १० दिवसांचा आंखण्यांत आला आहे.

**बाल-कलावंतांच्या चित्रांचें प्रदर्शन**—'शंकर्स वुइकली' ह्या नियतकालिकातर्फे भरविण्यांत आलेल्या लहान मुलांनीं काढलेल्या चित्रांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन दिल्ली येथें भरविण्यांत आलें आहे. निरनिराळ्या देशांतील मुलांनीं काढलेलीं २,००० चित्रें प्रदर्शनांत मांडण्यांत आलीं आहेत. प्रदर्शन महिनाभर चालू राहील. चित्रांशिवाय मुलांनीं केलेल्या बाहुल्या व इतर कलाकृतीहि प्रदर्शनांत ठेवण्यांत आल्या आहेत.

**एंजिनिअर्सहि बेकार आहेत**—भारतामधील उद्योग-विनिमय-केंद्रांतून नोकरीसाठी नांवें नोंदलेल्या सुशिक्षित बेकारांची संख्या १९५५ च्या डिसेंबरअखेर २,१६,१५७ इतकी होती. त्यांपैकी २६,२३४ पदवीधर होते. पदवीधरांपैकी ६२८ एंजिनिअर्स, १७९ डॉक्टर्स, आणि २५,४१८ इतर विषयांतील पदवीधर होते. मॅट्रिक झालेल्या बेकारांची संख्या १,८९,९२३ इतकी होती.

**कापड-कामगारांना बोनस**—राष्ट्रीय मिल मजदूर संघ व गिरणी मालक संघ ह्या संस्थांत झालेल्या पांच वर्षें मुदतीच्या करारास अनुसरून मुंबईमधील कापड-कामगारांना १९५२ व १९५३ सालचा बोनस देण्यांत आला. ६० गिरण्यांपैकी ५५ गिरण्यांनीं करारावर सह्या केल्या आहेत. १४ कारखान्यांच्या कामगारांना ३ महिन्यांचें वेतन बोनस म्हणून देण्यांत आलें. ८ गिरण्यांतील कामगारांना ६ ते ८ आठवड्यांचें वेतन देण्यांत आलें.

**भारतांत तेल सांपडण्याची शक्यता**—भारतांत खनिज तेल सांपडण्याची शक्यता अजमावून पहाण्यासाठी सोव्हिएट भूस्तर-शास्त्रज्ञांचें एक मंडळ आलें होतें. त्यांनीं आपला प्राथमिक अहवाल तयार केला आहे. त्यांच्या मतानें आसाम, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, ओरिसा, पंजाब, राजस्थान, सौराष्ट्र, आंध्रचा किनारा, मद्रास व त्रावणकोर-कोचीन ह्या भागांत तेल सांपडण्याचा संभव आहे.

**संस्थानांचें विलिनीकरण कसें झालें ?**—भारतामधील संस्थानांच्या विलिनीकरणाचा इतिहास कथन करणारा ग्रंथ श्री. व्ही. पी. मेनन् ह्यांनीं लिहिला असून तो भारत, ब्रिटन व अमेरिका ह्या देशांत एकाच वेळीं प्रसिद्ध करण्यांत यावयाचा आहे. ग्रंथ ५०० पृष्ठांचा असून तो लिहिण्यासाठी रॉकफेलर फौंडेशन ह्या अमेरिकन संस्थेनें आर्थिक मदत दिली आहे.

**नवीन भांडवलाला परवानगी**—१ जुलै १९५५ ते ३० सप्टेंबर १९५५ ह्या कालांत भांडवलाची उभारणी करण्याची मागणी करणाऱ्या १०० अर्जदारांना परवानगी देण्यांत आली. ह्या अर्जदारांत औद्योगिक व बिगर-औद्योगिक अशा दोन्ही प्रकारच्या कंपन्या असून त्यांनीं ३०·७४ कोटी रुपये भांडवल जमविण्याचे परवाने मागितले होते. ह्यांपैकी २२ कंपन्या नव्या होत्या व त्यांचें संकलित भांडवल १५·६३ कोटी रुपये होते.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

**भरपाई झालेलें भांडवल**

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फें | रु. ३५,२३,७०० | |
| मुंबई सरकारतर्फें | रु. २६,००,००० | |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

**१४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




# अर्थ

बुधवार, ता. १४ मार्च, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतीय जनतेचें मांसाशनाचें प्रमाण

भारतामध्यें इतर कोणत्याहि देशांपेक्षा दूध देणाऱ्या व मांस देणाऱ्या जनावरांची संख्या अधिक आहे. तथापि, ह्याचा अर्थ देशांतील मांस खाणाऱ्या लोकांना पुरेसें मांस मिळतें असा मात्र नाहीं. मांसाशन करणाऱ्या हिंदी नागरिकाला, वर्षाला सरासरीनें ३ ते ४ पौंड इतकेंच मांस मिळतें, असा हिशोब करण्यांत आला आहे. दरमाणशीं दरसाल खपणाऱ्या मांसाच्या बाबतींत दक्षिण अमेरिकेंतील युराग्वे ह्या देशाचा पहिला अनुक्रम लागतो. त्या देशांत दरमाणशीं दरसाल २८२ पौंड मांस खपतें. त्यानंतर अमेरिकेचा नंबर लागतो. अमेरिकेंत दरसाल दरडोई १५४ पौंड मांस खपतें. जनावरांच्या वाढीसंबंधीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या ताज्या अहवालावरून असें दिसून येत आहे कीं दुधासाठीं अगर मांसासाठीं उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांच्या वाढीचें प्रमाण हें मनुष्याच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. म्हणजे, भारतामधील लोकसंख्या जितक्या गतीनें वाढत आहे तितक्या गतीनें ह्या प्राण्यांच्या संख्येंत भर पडत नाहीं. अर्थातच, मांसाहारी लोकांच्या आहारांत मांसाचें प्रमाण कमी झाल्याचें दिसून येणें अपरिहार्यच होतें. शिरगणतीच्या अहवालावरून असें आढळून येतें कीं १९४१ सालीं संपलेल्या दहा वर्षांच्या कालांत भारताची लोकसंख्या १५ टक्क्यांनीं वाढली. उलटपक्षीं ह्याच मुदतींत मांसाशनासाठीं उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांची संख्या ७·२ टक्क्यांनींच वाढली. भारतामधील गुरांच्या कत्तलखान्यांतून दरसाल ४·६१ लाख टन मांस बाजारांत विक्रीसाठीं पाठविण्यांत येतें. मांसाची विक्री करणारे लोक दरसाल ७६·१ कोटी रुपये मिळवितात. खाण्यास योग्य पण उत्तम प्रतीचें नाहीं असें मांस जमेस धरल्यास, भारतामधील खाटीकखान्यांतून दरसाल १०० कोटी रुपयांचें मांस उपलब्ध होतें. भारतीय सरकारचें अन्न व शेतकीखातें खाटिकखान्यांची सुधारणा करण्याचा विचार करीत आहे. भारतीय परिस्थितीला योग्य असे नवे नियम सरकार करणार आहे.

---

## ब्रिटिश शास्त्रज्ञानें व्यक्त केलेला आशावाद

पदार्थविज्ञानशास्त्राचे एक अधिकारी, प्राध्यापक आणि नोबेल पारितोषक मिळविणारे ब्रिटिश शास्त्रज्ञ प्रो. पॉवेल ह्यांनीं मुंबई येथें नुकतेंच एक व्याख्यान दिलें. असोसिएशन ऑफ सायंटिफिक वर्कर्स ऑफ इंडिया ह्या संस्थेच्या आमंत्रणावरून ते मुंबईंतील जयहिंद कॉलेजमध्यें बोलत होते. हैड्रोजन बॉंबच्या शोधामुळें एका युगाची समाप्ति झालेली नसून उलट नव्या युगाला प्रारंभ झाला आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें. ते पुढें म्हणाले, कीं ह्या प्रचंड शक्तीच्या शांततामय उपयोग करण्याच्या प्रश्नानें शास्त्रज्ञांना आव्हानच दिलेलें आहे. जपानवर टाकण्यांत आलेल्या अणुबॉंबची स्फोटक शक्ति २०,००० टन टी. एन. टी. होती; तर एका हैड्रोजन बॉंबची स्फोटकता २ कोटी टन टी. एन. टी. इतकी असते. तथापि ही प्रचंड शक्ति शांततामय कार्यासाठीं वापरतां येणें शक्य आहे. भारताच्या दृष्टीनें ही घटना फारच आशादायक आहे. भारताजवळील कोळशाचा पुरवठा कांहीं शतकांत संपेल इतकाच आहे. हा सांठा संपल्यावर ह्या देशाला अणुशक्तीचा उपयोग करून औद्योगिक शक्तीची निर्मिति करावी लागेल. भारतानें आपला औद्योगिक उत्कर्ष साधण्यासाठीं पंचवार्षिक कार्यक्रम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. एका मागून एक अंमलांत येणाऱ्या ह्या औद्योगिक विकासाच्या कार्यासाठीं भारताला वाढत्या प्रमाणांत औद्योगिक शक्तीची गरज लागेल. सुदैवानें अणुशक्तीचा शांततामय उपयोग करण्याची शक्यता दिसूं लागली आहे. भारताच्या दृष्टीनें ही घटना उचित वेळेला घडून आलेली आहे, असें म्हणतां येईल. तथापि, ही आशा पल्लवित होण्यास जगांतील राष्ट्रांनीं एकत्र येऊन हैड्रोजन बॉंबच्या उपयोगासंबंधीं कांहींतरी तडजोड घडवून आणली पाहिजे. अशी तडजोड होईपर्यंत जगांतील लोकांना भीतीच्या छायेंतच वावरावें लागेल.

---

## गुजरातमधील साखरेचा पहिला कारखाना

गुजरातमधील पहिला साखरेचा कारखाना बारडोली येथें काढण्यांत येत आहे. सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या ह्या कारखान्याच्या पायाभरणीचा समारंभ मुंबई राज्याचे मुख्य मंत्रि श्री. मुरारजीभाई देसाई ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. बारडोलीच्या आसपासच्या २० मैलांच्या परिसरांतील शेतकऱ्यांनीं कारखान्यासाठीं २० लाख रुपयांचें भांडवल गोळा केलें आहे. मुंबई सरकारनें कारखान्याचे १० लाख रुपयांचे भाग विकत घेतलेले आहेत. यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठीं मध्यवर्ती फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून ४५ लाख रुपयांचें कर्जहि मिळालेलें आहे. दररोज १,००० टन ऊंस गाळणारी यंत्रसामुग्री एका जर्मन कारखान्याकडून विकत घेण्यांत आली आहे. कारखान्याचे तंत्रज्ञच यंत्रसामुग्रीची उभारणी करणार असून प्रत्यक्ष उत्पादनास येत्या डिसेंबरपासून सुरवात होईल असा अंदाज आहे. बारडोली भागांतील ज्या जमिनीला पाण्याचा चांगला पुरवठा होऊ शकेल अशा ३,००० एकर क्षेत्रांत चालू सालीं उसाची लागवड करण्यांत येणार आहे. १९५५ सालीं प्रयोग म्हणून व उसाचें बेणें तयार करण्यासाठीं म्हणून ३०० एकर जमिनींत ऊंस लावण्यांत आला होता. गेल्या वर्षी तयार झालेल्या उसाचा गूळ तयार करण्यांत आला. समारंभाला हजर रहाण्यासाठीं आसपासच्या खेड्यांतून सुमारें ६,००० शेतकरी आले होते. त्यांच्यासमोर भाषण करतांना श्री. देसाई म्हणाले, कीं सहकारी पद्धतीनें काम करूं लागल्यास किती कार्य करतां येतें तें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. बारडोलीच्या लोकांनीं सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळापासून पुष्कळच कार्य केलेलें आहे. ह्यापुढेंहि त्यांनीं स्वस्थ बसतां कामा नये. सहकार्याच्या भावनेनें प्रेरित होऊन विधायक कामें करण्याचें त्यांनीं चालूच ठेवलें पाहिजे. पारडी तालुक्यांतील एका खेडेगांवीं सहकारी पद्धतीची शेती सुरू करण्यांत आली आहे. ह्या संस्थेचें उद्घाटनहि श्री. देसाई ह्यांनीं केलें.

## नव्या कंपनी कायद्याची अंमलबजावणी

### १ एप्रिलपासून सुरू

नवा कंपनी कायदा १ एप्रिल, १९५६ रोजीं अंमलांत येणार आहे. त्या कायद्याच्या ३१४ व्या कलमाप्रमाणें, डायरेक्टर्स किंवा त्यांचे नातेवाईक ह्यांच्या कंपनींतील पगाराच्या किंवा नफ्याच्या नेमणुकांस कंपनीच्या स्पेशल ठरावानें मान्यता मिळाली पाहिजे. ६४५ व्या कलमाप्रमाणें, ह्या नेमणुका आपोआप रद्द होणार नाहींत; त्या चालूच रहातील. पण, स्पेशल ठरावानें त्यांना मान्यता देण्यांत आली नाहीं, तर डायरेक्टरांना मात्र आपल्या डायरेक्टरशिपला मुकावें लागेल. कायद्याची अंमलबजावणी थोडी पुढें ढकलावी, असे अनेक अर्ज सरकारकडे आले आहेत. पण तसें करण्याची आवश्यकता नाहीं; कारण जरी १८ जानेवारी, १९५६ रोजीं राष्ट्रपतींनीं कायद्याला मंजुरी दिली असली, तरी पार्लमेंटनें मंजूर केलेलें बिल नोव्हेंबरपासून जनतेपुढें आहे, असें सरकारचें मत आहे. आर्टिकल्स व मेमोरँडम नव्या कायद्यास अनुसरून बदलण्याची आवश्यकता असली तरी कायद्याच्या ९ व्या कलमाप्रमाणें सर्वच कंपन्यांना नवा कायदाच मानावा लागेल; त्यांच्या आर्टिकल्समध्यें किंवा मेमोरँडममध्यें कांहींहि तरतुदी असोत. तेव्हां त्यांत दुरुस्ती करण्यास थोडा विलंब लागला तरी सरकार त्याकडे दुर्लक्ष करील. पण कंपनीचा व्यवहार मात्र नव्या कायद्याप्रमाणेंच चालविण्यांत आला पाहिजे. कांहीं दैनंदिन अडचणी आल्या, तर कारभार करणारांचा हेतु लक्षांत घेऊन वर्तनाविषयीं विचार केला जाईल. उदाहरणार्थ, ३१४ व्या कलमाखालीं वर सांगितल्याप्रमाणें स्पेशल ठराव करावा लागेल. त्यासाठी ३१ मार्च पूर्वी सभेची नोटीस पाठविली आणि प्रत्यक्ष सभा मागाहून झाली, तरी हरकत नाहीं. कंपन्यांनीं आपले ताळेबंद व नफा-तोटापत्रकें कोणत्या नमुन्याप्रमाणें तयार करावींत हें कायद्यानें ठरवून दिलेलें आहे. ३१ मार्च, १९५६ पूर्वी ज्यांचें आर्थिक वर्ष संपेल, त्यांनीं नव्या कायद्याप्रमाणेंच हिशेब मांडावेत असा आग्रह सरकार धरणार नाहीं. ३१ मार्च नंतर ज्यांचें वर्ष संपेल, त्यांनाहि नव्या पद्धतीनें हिशेब मांडणें अवघड जाईल, ह्याची सरकारला जाणीव आहे. कारण, हिशेबाच्या वह्या त्याला अनुसरून वर्षभर ठेवलेल्या नसणें स्वाभाविक आहे. ज्या कंपन्यांना खरोखरच अडचण भासेल, अशांच्या बाबतींत सरकार सवलत देण्यास तयार होईल. १८ फेब्रुवारीच्या सरकारी खास गॅझेटांत जनरल रूल्स व फॉर्म्स प्रसिद्ध करण्यांत आले आहेत व त्यांच्या प्रती मॅनेजर, गव्हर्मेंट ऑफ इंडिया पब्लिकेशन्सकडे विक्रीसाठी ठेवल्या आहेत.

---

### प्रपोज्ड श्री. सोमेश्वर सहकारी कारखाना कोथहाळे बु.

मुंबई सरकारनें यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणें पुणें जिल्ह्यांत निरा लेफ्ट बँक कॅनॉलवर फाटा नं. २ ते १८ या एरियांत एक सहकारी साखरकारखाना काढण्याची योजना या भागांतील ऊंस-बागायतदारांनीं तयार केली असून ती प्रपोज्ड श्री. सोमेश्वर सहकारी साखर कारखाना कोथहाळे बु. या नांवानें आपलें प्राथमिक कार्य करीत आहे. या योजनेच्या कार्यक्षेत्रांतील ऊंस-बागायतदारांनीं आजपर्यंत तीन लक्ष रुपये शेअर्स भांडवल जमा केलें आहे. मुंबई सहकारी कायद्याखालीं सदर योजना नोंदविण्याकरितां सहकारी खात्याकडे पाठविली आहे व ती लौकरच रजिस्टर होण्याचे मार्गावर आहे.

## दि बँक ऑफ कराड लि., कराड

वरील बँकेस १९५५ मध्यें २८,६४६ रु. नफा झाला. रिझर्व्ह व इतर फंडांत ८ हजार रुपये टाकून व १२,००० रुपये इन्कम-टॅक्स तरतूद करून, ४% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ८,७१० रुपयांचा विनियोग करण्यांत येईल.

बँकेला व्याज व डिस्कौंटचे १,२२,७५९ रु. व कमिशन-हुंडणावळीचें ६,६३९ रु. उत्पन्न मिळालें आणि बँकेनें ६३,०६६ रु. व्याज दिलें. बँकेनें सातारा शाखा १९५१ मध्यें सुरू केली व ती स्वावलंबी झाली आहे. १३ मार्च रोजीं बँकेची इस्लामपूर शाखा सुरू झाली आहे, तीहि लवकरच भरभराट पावेल, अशी अपेक्षा आहे. लहान गांवांतून बँकिंगच्या सोयी उपलब्ध करून देण्याचें सरकारचें धोरण आहे. त्याप्रमाणेंच ह्या बँकेचा कारभार चालू आहे. त्यामुळें खेड्यापाड्यांतील लोकांची कर्जाची सोय योग्य अटींवर होऊं शकते. बँकेला स्थापनेपासूनच (१९४६) नामवंत, पतवान व तज्ञ अशा डायरेक्टरांचें बोर्ड लाभलेलें आहे. बँकेचे चेअरमन, श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, हे कराड अर्बन को. बँकेचे २० वर्षे चेअरमन होते व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ ह्या बँकेस मिळत आहे. लहान आकाराच्या व्यापारी बँकांत ह्या बँकेचा सर्वच दृष्टींनीं अनुक्रम वरती लागेल, ह्यांत संशय नाहीं.

(चेअरमन : ल. म. देशपांडे; मॅनेजर : म. वि. खंडकर)

---

**१९५५ सालीं छापलेल्या नोटा** —नाशिक येथील नोटा छापण्याच्या सरकारी कारखान्यांत १९५५ सालीं ८,३३,४८,२९,२४० रुपयांच्या नोटा छापण्यांत आल्या, अशी माहिती लोकसभेंत देण्यांत आली.


# दि बँक ऑफ कराड लि.

## हेड ऑफिस : कराड

शाखा : सातारा.

| | | |
|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. | २,१७,७५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ७१,००० |
| ठेवी | रु. | २१,००,००० |
| सरकारी कर्जरोखे वगैरेमध्यें इन्व्हेस्टमेंट | रु. | १०,८१,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँकेची शाखा इस्लामपूर (द. सातारा) येथें ता. १३ मार्च, १९५६ पासून सुरू झाली आहे.

कराड
तारीख
७-३-१९५६

म. वि. खंडकर
मॅनेजर.

## महाराष्ट्र बँकेची २० वर्षांतील कामगिरी

### वार्षिक सभेंत श्री. वा. पुं. वर्दे ह्यांचा अध्यक्षीय आढावा.

आपल्या बँकेला वीस वर्षे पूर्ण झालीं व तिनें एकविसाव्या वर्षांत पदार्पण केलें. अहवालाचे वर्षीं बँकेनें केलेल्या प्रगतीचा तपशीलवार आढावा ताळेबंदांत दिलेला आहेच. बँकेची ही प्रगति समाधानकारक आहे, असें माझ्याप्रमाणेंच आपणांसहि वाटेल. नफा हें कांहीं बँकेच्या प्रगतीचें एकमेव गमक नव्हे. तरी पण त्याहि दृष्टीनें आपल्याला बँकेची प्रगति झालेली दिसून येईल. अहवालाचे वर्षीं आपला नफा रु. ३,२४,७२१ = (१९५४) वरून रु. ३,४५,७९५ इतका वाढला. बँक ॲवॉर्डप्रमाणें नोकरवर्गास फरकाचे रूपानें द्यावी लागणारी सर्व रक्कम संचालक मंडळानें एक रकमेनें दिली. नाहीं तर नफ्याची ही रक्कम यापेक्षाहि अधिक दिसली असती.

अहवालाचे वर्षीं बँकेच्या ठेवी जवळ जवळ एक कोटी रुपयांनीं वाढल्या. ठेवींतील ही वाढ म्हणजे बँकेच्या स्थैर्यावरील जनतेच्या वाढत्या विश्वासाचें प्रतीक होय.

### आधीं स्थैर्य, मग डिव्हिडंड

देशाचे अर्थव्यवस्थेतील बँकांचें महत्त्व आतां वाढत्या प्रमाणांत मान्य होत आहे. पण बँकांचें हें महत्त्व ओळखुन लहानसहान उद्योगधंद्यांना बँकिंगच्या सवलती देण्याचे उद्देशानें वीस वर्षांपूर्वींच ही बँक सुरू केली गेली. नफा मिळविण्याचा हेतु हा दुय्यम होता. मिळालेल्या नफ्याचा उपयोग प्रथम बँकेला आर्थिक स्थैर्य आणण्याकरितां व राहिलेल्या रकमेंतून भागीदारांना योग्य तें डिव्हिडंड देण्याकरतां करावयाचा, असें धोरण होतें. संस्थापकांच्या या धोरणास अनुसरूनच आपल्या संचालक मंडळानें आपली गंगाजळी भक्कम करण्याकडे प्रथम लक्ष पुरविलें आहे. त्याचबरोबर, भागीदारांना सुरवातीपासूनच योग्य ते डिव्हिडंडहि दिले आहेत. केवळ २० वर्षांच्या अल्प काळांत आपली गंगाजळी रु. ८,७५,००० इतकी झाली आहे. या रकमेचें आपल्या वसूल भांडवलाशीं जवळजवळ ५५ टक्के इतकें प्रमाण पडतें. वसूल भांडवलाची सुरवातीपासूनची सरासरी काढली तर हेंच प्रमाण शें. ९१ टक्के होईल. या धोरणामुळें भागीदारांचा विशेष वैयक्तिक लाभ झाला नसला तरी त्यांच्या या स्वार्थत्यागांतून आपला सर्वांचा प्रशंसनीय असा सामुदायिक लाभ झाला आहे, हें आपल्या लक्षांत येईल.

### शाखा वाढीचें धोरण

ही बँक सुरू झाली तेव्हां महाराष्ट्रांतील कित्येक लहानसहान उद्योगधंद्यांना आवश्यक त्या बँकिंगच्या सवलती व खेळतें भांडवल मिळणें अत्यंत कठीण होतें. आपल्या बँकेनें त्यांच्यापैकी अनेकांना योग्य वेळीं आर्थिक साहाय्य व सवलती देऊन पुढें आणलें आहे, हें नमूद करण्यास समाधान वाटतें. गेल्या कांहीं वर्षांत महाराष्ट्रांत वाढत्या प्रमाणावर होत असलेली उद्योगधंद्यांची वाढ हें बँकेच्या उद्दिष्टांचें अंशतः साफल्य आहे. आपल्या बँकेचें स्थैर्य व बँकिंगच्या क्षेत्रांत तिला मिळालेला नांव-लौकिक, तसेंच महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या प्रगतींत बँकेनें केलेली अल्पशी कामगिरी, ही आपल्याच सहकार्यामुळें शक्य झालेली आहे. म्हणून आतां व्यापारी व महत्त्वाच्या ठिकाणीं शाखा उघडण्याचें संचालकांनीं ठरविलें आहे. या ठिकाणीं हें नमूद करणें आवश्यक आहे, कीं ठिकठिकाणीं शाखा उघडण्यांत स्थानिक व इतर बँकांशीं कोणत्याहि प्रकारची स्पर्धा करण्याचें आमचें धोरण नव्हतें व यापुढेंहि हेंच धोरण राहील. आपल्या अनेकविध व कार्यक्षम सेवेच्या जोरावर आपला एक विशिष्ट ग्राहकवर्ग बँकेनें निर्माण केला आहे व इतर स्थानिक बँकांना जरूर तें साहाय्य केलें आहे.

### व्यवस्थापकवर्ग व नोकरवर्ग ह्यांचा सलोखा

सध्यां अनेक औद्योगिक संस्थांतून व्यवस्थापकवर्ग व नोकरवर्ग यांच्यांत मोठ्या प्रमाणावर औद्योगिक कलह व बेबनाव चालू असतांना आपल्या व्यवस्थापकवर्गाचे व नोकरवर्गाचे संबंध पूर्वीप्रमाणेंच जिव्हाळ्याचे राहिले आहेत, हें पाहून आपणास समाधान वाटेल. याचें कारण म्हणजे आपल्या बँकेंतील वेतनश्रेणी व नोकरीबाबतच्या इतर शर्ती, या योग्य अशा असून संस्थेची जसजसी वाढ होत जाईल तसतशा त्या बदलल्या जातात. तसेंच, अगदीं कनिष्ठ व अगदीं वरिष्ठ नोकर यांचे पगारांत म्हणण्यासारखी विषमता नाहीं. सेवा व स्वार्थत्याग या भावनेनेंच सर्वजण काम करीत असल्यामुळें व्यवस्थापकवर्ग व नोकरवर्ग यांचे संबंध आपुलकीचे राहिले आहेत. बँकिंगची आवड असलेल्या होतकरू तरुणाला आपली कर्तबगारी दाखविण्यास संधि व उत्तेजन दिलें जातें.

बँकेला आज प्राप्त झालेलें यश हेंच आपल्या सर्वांच्या श्रमाचें फळ होय. अहवालाचे वर्षीं आमचे सर्व नोकरवर्गानें कार्यक्षमतेनें व सहकार्याचे भावनेनें काम करून बँकेचे प्रगतीस हातभार लावला याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. तसेंच, संचालक-मंडळावरील माझे इतर सहकारी व आपले मॅनेजर श्री. जोग यांचेहि मी कृतज्ञापूर्वक आभार मानतों. त्यांचे सहकार्यामुळेंच "बँक ऑफ महाराष्ट्र" हें सार्थ नांव असलेल्या आपल्या या वाढत्या संस्थेची वाढती जबाबदारी पार पाडणें मला शक्य होत आहे.

# NOTICE

## BHOR STATE BANK, Ltd., BHOR.

Notice is hereby given that the 12th Ordinary General Meeting of the Shareholders of Bhor State Bank, Ltd. will be held at 361-62 Budhwar Peth, Poona City at 4 p. m. (S. T.) on the 31st March 1956 to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended on 31st December 1955.

(2) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(3) To appoint Auditors for the current year and to fix their remuneration.

(4) To transact such other business as may be allowed by the Chairman.

(5) The following resolution, notice of which is already given on 7th March 1956, will be moved as Special Resolution immediately after the ordinary business has been disposed of :—Special Resolution : (1) Resolved that the Bank consents to Shri. Gajanan Yeshvant Khole, a clerk of the Bank who is related to Shri. M. V. Shingre and Shri. Y. D. Khole, Directors of the Bank continuing his employment with the Bank.

By order of the Board.

Bhor, 11th March 1956. Y. S. JOSHI, Asstt. Manager.

## जमशेटजी टाटा ह्यांचा जन्मदिन

### लॉर्ड रे महाराष्ट्र औ. संग्रहालयांत रबर विभागाचें उद्घाटन

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें याचे विद्यमानें दि. ३ मार्च १९५९ रोजीं स. ९–३० ला कॉमन्वेल्थ इमारतींतील संग्रहालयाच्या सभागृहांत डॉ. र. पु. परांजपे यांचे अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध भारतीय उद्योगपती, जमशेटजी टाटा यांचा जन्मदिवस साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं संग्रहालयामध्यें नवीन उघडण्यांत आलेल्या रबर या विभागाचें उद्घाटन व संग्रहालयातर्फें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या "रबर" या पुस्तकाचें प्रकाशन डॉ. परांजपे ह्यांचे हस्तें करण्यांत आलें.

सुरुवातीस संग्रहालयाचे एक विश्वस्त सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांनीं अध्यक्षांचें व उपस्थितांचें स्वागत केलें. आपल्या भाषणामध्यें त्यांनीं जमशेटजी टाटा यांचा जन्मदिवस दर वर्षीं उद्योगधंद्यासंबंधीं विद्यार्थी व नागरिक यांचे मनांत आवड उत्पन्न करणारा एखादा उपक्रम हातीं घेऊन संग्रहालयातर्फें साजरा केला जातो, असें सांगितलें; व या वर्षीं त्यानिमित्तानें "रबर" प्रदर्शन उघडण्यांत येत आहे व संग्रहालयातर्फें या विषयावरील एक छोटेसें पुस्तक प्रकाशित करण्यांत येत आहे, असें सांगितलें.

संग्रहालयाचे क्यूरेटर श्री. सरदेसाई यांनीं संग्रहालयासंबंधीं माहिती सांगून संग्रहालयाचे माजी क्यूरेटर कै. घारपुरे यांचे प्रयत्नानें संग्रहालयाची झपाट्यानें वाढ होत असतांना संग्रहालयाचे शिक्षणविषयक कार्यक्रम हळु हळु कसे वाढत गेले त्याची माहिती सांगितली. सुरुवातीस कै. घारपुरे यांनीं संग्रहालयास येणाऱ्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करणें व शाळांमध्यें व्याख्यानें देणें हा उपक्रम केला व नंतर ह्या कामासाठी एका खास व्याख्यात्याची नेमणूक झाली. कै. घारपुरे हे विश्वस्त समितीच्या अनुज्ञेनें १९४७ मध्यें इंग्लंड, अमेरिकेस जाऊन आल्यानंतर संग्रहालय शिक्षणविभागाला विशेष मूर्तस्वरूप आलें व या विभागातर्फें व्याख्यानें, सहली, चित्रपटदर्शन, या बरोबरच संग्रहालयांतील वस्तू वारंवार शाळांमध्यें पाठविणें, पाठाकरितां साहित्य पुरविणें, इत्यादि इत्यादि कार्य केलें जातें. मुंबई सरकारकडून ह्या कामासाठी संग्रहालयास एक खास देणगी मिळत आहे. विद्यार्थ्यांसाठी संग्रहालयाच्या जंगल व शेतीविभागातर्फें विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतीशिक्षण देण्यांत येतें व नागरिकांसाठी औद्योगिक व शास्त्रीय विषयांवरील साप्ताहिक व वासंतिक व्याख्यानमाला चालविल्या जातात, ह्याचाहि त्यांनीं उल्लेख केला व या विभागातर्फें ह्या वर्षी झालेल्या कार्याचा थोडक्यांत आढावा त्यांनीं घेतला. यानंतर रबर ह्या उद्योगाला जगामध्यें अतिशय महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे व भारतांतहि स्वातंत्र्यप्राप्तिनंतर या उद्योगाच्या वाढीकडे सरकारचें लक्ष आहे असें सांगितलें.

नैसर्गिक व कृत्रिम रबराचे जागतिक उत्पादनासंबंधीं माहिती सांगून विशेषतः वाहतुकीचे साधनांत रबराला किती महत्त्वाचें स्थान आहे याचा त्यांनीं निर्देश केला. त्यानंतर सरकारनें नेमलेल्या 'इंडियन रबर बोर्ड'च्या कामाची माहिती देऊन भारतांतील रबराखालील क्षेत्र व उत्पादन यांच्या वाढीची कल्पना दिली. अशा महत्त्वाच्या उद्योगधंद्यांसंबंधींचे विभाग आजच्या प्रसंगानें संग्रहालयांत उघडण्यांत येत आहेत असें सांगून प्रदर्शनांतील विविध वस्तूंसंबंधीं त्यांनीं थोडक्यांत माहिती सांगितली.

यानंतर डॉ. परांजपे यांनीं प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. डॉ. परांजपे यांनीं फीत कापतांच गॅस भरलेल्या फुग्यांनीं ती अलगत वर उचलली. तेव्हांचें दृश्य खरोखरीच फारच मनोहर होतें. यानंतर अध्यक्षांनीं 'रबर' पुस्तकाचें प्रकाशन झालें, असें जाहीर केलें.

त्यांनीं प्रथम उद्योगपती जमशेटजी यांच्या विशाल दृष्टीचा उल्लेख करून कारखाना काढण्यापूर्वी धंद्याची संपूर्ण माहिती घेतली, हें उदाहरण डोळ्यासमोर ठेवणें आवश्यक आहे असें सांगितलें. कै. नामजोशी यांनीं या संग्रहालयास सुरुवात केली असें सांगून कै. घारपुरे यांच्या प्रयत्नानें व सरकारी सहकार्यामुळें संग्रहालयास आजचें स्वरूप प्राप्त झालें. त्यानंतर रबराच्या शोधापासून आजपर्यंतचा त्याचा इतिहास व उपयोग यांची थोडक्यांत कल्पना त्यांनीं दिली. या महत्त्वाच्या उद्योगाबाबतचें हें प्रदर्शन उघडण्यास मला फार आनंद वाटतो, असें सांगून त्यांनीं भाषण संपविलें.

त्यानंतर जमशेटजी टाटा यांचे स्तुतिपर असलेली गाण्याची एक ध्वनिमुद्रिका लावण्यांत आली. श्री. वि. म. देवल, विश्वस्त, यांनीं आभारप्रदर्शन केल्यानंतर हा कार्यक्रम संपला.

---

## अमेरिकनांचें परदेश पर्यटन

### प्रतिवर्षी २०० कोटी डॉलर खर्चाचा अंदाज

अमेरिकन प्रवासी सध्यां परदेशपर्यटनांत दरवर्षी सुमारें १०० कोटि डॉलर खर्च करीत असून एका अग्रगण्य अमेरिकन प्रवासी कंपनीच्या मतें १९६० पर्यंत हा आंकडा दुप्पट होईल.

प्रवासाची आजची प्रवृत्ति अशीच वाढत राहिल्यास १९६० पर्यंत आणखी ५० टक्के अमेरिकन परदेशीं जातील. यंदांच्या जानेवारींत घेण्यांत आलेल्या आढाव्यानुसार प्रतिवर्षी जेवणखाण, रहाणें व वहातुक आदि प्रवासखर्चात त्यांचे २०० कोटि डॉलर खर्च होतील असा अंदाज आहे.

हा आढावा म्हणतो कीं, अमेरिकेंतील मध्यम व कमी प्राप्तीचा वर्ग आतां वाढत्या प्रमाणांत परदेशांचा फेरफटका करूं लागला असून या नव्या प्रवाशांमुळेंच परदेशांतील प्रवासांत इतकी आश्चर्यकारक वाढ झाली.

१९५९ अखेरीस परदेशगमनांत क्रांतिकारक बदल होतील. उतारवाहू जेट विमानांचा वेग इतका मोठा असेल कीं त्यामुळें अवघ्या साडेसहा तासांत न्यूयॉर्कचा प्रवासी पॅरिसला जाऊन पोंचेल; आणि शिकॅगो ते लंडनमधला प्रवास तो सात तासांत आटोपेल.

१९६० पर्यंत आठवड्याअखेरची सुटी युरोपांत काढून परत फिरणें हीं सहज शक्य अशी गोष्ट होईल. जेट प्रवास मोठ्या प्रमाणावर वाढल्यानें अटलांटिक–पार विमान प्रवासाचे दरहि आजच्यापेक्षा कमी होतील. लांब पल्ल्याच्या प्रवासाची जेट उतारू विमानें खरेदी करण्यासाठी अमेरिकेंतील देशी व परदेशी विमान कंपन्यांनीं आजच १०० कोटि डॉलरपेक्षाहि अधिक रकमेच्या ऑर्डरी नोंदविल्या आहेत.

बोट कंपन्याहि जेट विमानांच्या या भावी स्पर्धेला तोंड देण्यासाठी सज्ज होत असलेल्या दिसतात. भावी काळाच्या दृष्टीनें त्या योजना आंखत आहेत.

## सहकारी संस्था व बिगर सभासद

लेखकः—श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., पुणें

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें नोंदलेल्या बहुतेक सर्व सहकारी संस्थांचा व्यवहार त्या संस्थेच्या सभासदांपुरता मर्यादित असतो. परंतु कांहीं सहकारी संस्थेचे कांहीं वेळां बिगरसभासदांबरोबर व्यवहार झालेले असतात. बिगर सभासद व सहकारी संस्था यांचे दरम्यान कांहीं वाद अगर तंटा उपस्थित झाल्यास अशा वादांचा अगर तक्रारींचा निर्णय कोणत्या न्यायालयांत होतो हें समजणें जरूर झालें आहे. सदरच्या कायद्याचें कलम ५४ अन्वयें सभासद व सहकारी संस्था अगर सभासदांमधलि वाद अगर सहकारी संस्था व तिचे पदाधिकारी अगर नोकरवर्ग ह्यांचे दरम्यान निर्माण होणारे तंटे लवाद कोर्टांत निर्णयासाठी पाठवले जातात. अशी परिस्थिति बिगरसभासदांचे बाबतीत नाहीं. बिगरसभासद व सहकारी संस्था ह्यांचे दरम्यान निष्पन्न झालेल्या वादांचा निर्णय लवाद कोर्टास देतां येत नाहीं अगर असे वाद लवाद कोर्टांत पाठविले जात नाहींत. तसेंच सभासदांबरोबर बिगरसभासदांस एकाद्या दाव्यांत पक्षकार करावयाचे झाल्यास अशा स्वरूपाचे दावेहि लवाद कोर्टांत चालत नाहींत. ज्यावेळीं सभासद व बिगरसभासद एकाच दाव्यांत पक्षकार करावयाचे असतात त्यावेळीं अशा प्रकारचे दावे दिवाणी कोर्टांत दाखल करून घेऊन त्यांचा निर्णय करून घ्यावा लागतो. उदाहरणार्थ, आपण असें समजूं, कीं एखाद्या सभासदानें सहकारी संस्थेकडून कर्ज घेतलें आहे व त्या कर्जास बिगरसभासद जामीन दिलेला आहे व त्याची जामीनकी सहकारी संस्थेनें स्वीकारून दोघांच्या संयुक्त जबाबदारीवर कर्ज दिलेलें आहे. कालांतरानें मूळ कर्जदारानें रकमेचा उलगडा केला नाहीं व सदर संस्थेस कर्जवसुलीकरतां कायदेशीर इलाज करणेची वेळ आल्यास अशा पक्षकारांच्या विरुद्ध संस्थेस दिवाणी दावा करावा लागेल. कर्जवसुलीची फिर्याद संस्थेस लवाद कोर्टांत दाखल करतां यावयाची नाहीं. कारण, लवाद कोर्टास बिगर सभासदाविरुद्ध काम चालवणेची हुकमत अगर अधिकार नाहीं. एखाद्या लवाद कोर्टानें अशा परिस्थितींत बिगर सभासदांविरुद्ध दावा चालवणेचा आग्रह धरल्यास त्या कोर्टाचा निर्णय बिगरसभासदांवर बंधनकारक राहणार नाहीं व तो हुकूमनामा रद्दबातल होईल व अशा हुकुमनाम्याची बजावणीहि बिगरसभासदाविरुद्ध करतां यावयाची नाहीं. कारण, असा निवाडा नियमबाह्य व लवाद कोर्टानें अधिकारक्षेत्राचे बाहेर जाऊन केलेला असलेमुळें बेकायदेशीर आहे. बिगरसभासदाविरुद्ध लवाद कोर्टास निर्णय देतां येत नाहींत असें जेव्हां आपण म्हणतों त्यावेळीं सर्वच बिगरसभासदांचा त्यांत समावेश होतो असें मात्र नाहीं. जे बिगरसभासद सहकारी संस्थांच्या सभासदांकरवीं अगर मार्फत कांहीं हक्क, हित संबंध प्रस्थापित करतात अशा बिगरसभासदांचे व सहकारी संस्थांचे दरम्यान कांहीं वाद अगर तक्रार निर्माण झाल्यास त्या वादाचा निर्णय लवाद कोर्टास देतां येतो व तो निर्णय बिगरसभासदावर बंधनकारक आहे. सभासदाकरवीं अगर मार्फत हक्क सांगणाऱ्या बिगर सभासदांत सभासदांचे वारस एक्झिक्युटर्स, ॲडमिनिस्ट्रेटर्स, असाईनीज व ज्यावेळीं सभासदांनीं नॉमीनेशन करून नॉमिनी नेमले असतील त्यावेळीं असें नॉमिनी त्या सर्वांचा समावेश बिगर सभासदांत होते. एकादा लवाद दावा चालू असतांना एकादा सभासद पक्षकार मयत झाल्यास त्याचे कायदेशीर वारस कोण आहेत याची चौकशी करणेचा अधिकार लवाद कोर्टास आहे; इतकेच नव्हे तर अशा बिगर सभासद कायदेशीर वारसांना दाव्यांत पक्षकार करून त्यांचे विरुद्ध लवाद दाव्याचें कामकाज पुढें चालूं करणेचा व अंतीं निर्णय देणेचा अधिकारहि लवाद कोर्टास आहे. पैक्याच्या हुकुमनाम्याचे बजावणीचे कामीं मिळकतीचा खरेदीदार हा जरी बिगर सभासद असला तरी ऋणकोचा त्या व्यवहारापुरता प्रतिनिधि समजला जातो. कारण, खरेदी मिळकतीबाबतचे हक्क अशा बिगरसभासदांस ऋणको सभासदामार्फत मिळालेले असतात. हिंदू बापाचीं मुलें हीं त्याचीं कायदेशीर वारस असतात व बापाच्या इस्टेटींत अशा मुलांना बापामार्फत हक्क मिळालेले असतात. एखाद्या लवाद दाव्यांत एखादा हिंदू बाप मयत झाल्यास त्याचे मुलांना कायदेशीर वारस म्हणून सदरचे दाव्यांत पक्षकार म्हणून दाखल करतां येतें; अर्थात् मयत हिंदू बापाची जेवढी इस्टेट मुलांचे हातांत येईल तेवढ्यापुरतीच अशा मुलांची बापाच्या कर्जाबाबत जबाबदारी येते.

---

## भारताच्या व ब्रिटनच्या दरम्यानची विमान वहातूक

सध्या ब्रिटन व भारत ह्यांच्या दरम्यान प्रवाशांची ने–आण करण्यासाठी आठवड्यांतून सहादा विमानें सोडण्यांत येतात. पण एअर इंडिआ इंटर नॅशनल लवकरच रोजचें एक विमान सोडण्याची व्यवस्था करणार आहे, असें समजतें. त्याशिवाय मुंबई–बँकॉक–टोकिओ–सिंगापूर ह्या मार्गावर ह्या मार्गावरहि आठवड्यांतून दोनदा वहातूक करण्याचा विचार करण्यांत येत आहे. ह्या दोन्ही मार्गांवर आतां जादा वहातूक होणार असल्यामुळें एअर इंडिआच्या चालकांनीं दोन मोठीं ' कॉन्स्टेलेशन ' विमानें विकत घेण्याचें ठरविलें आहे. दोन्ही विमानांना मिळून सुमारें ४·५ कोटी रुपये किंमत द्यावी लागेल. भारतीय सरकारचे अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख ह्यांनीं १९५६–५७ सालच्या अंदाजपत्रकांत वरील कामासाठी २·७५ कोटी रुपयांची तरतूदहि केली आहे. १९५४–५५ सालांत कॉर्पोरेशनला १३·९५ लाख रुपये नफा झाला. १९५५–५६ सालांत मात्र ७५,००० रुपयांचा नाममात्र नफा होईल असें दिसतें. कॉर्पोरेशनला सरकारनें जें भांडवल पुरविलें आहे त्यावरील व्याजाचा हिशेब १९५५–५६चा अंदाजी नफा काढतांना केलेला नाहीं. कारण, सरकारनें ज्या वेळीं भांडवल पुरविलें होतें त्याचवेळीं असें ठरविण्यांत आलें होतें कीं ३१ जुलै, १९५८ सालापर्यंत पुऱ्या होणाऱ्या पांच वर्षांत कॉर्पोरेशनकडून भांडवलावर व्याज घेण्यांत येऊं नये. हें व्याज आकारण्यांत आलें तर कॉर्पोरेशनला अर्थातच नफा होणार नाहीं. कॉर्पोरेशनचा कारभार चालवितांना कांहीं वेळा रोख रकमेचा तुटवडा भासतो. ही तूट भरून काढण्यासाठीहि १९५६–५७ सालच्या अंदाजपत्रकांत १·५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

तमाम दंतरोगांवर
☆ [illegible]छाप म्हणजेच [illegible]ळी टूथ पावडर ☆

## गिऱ्हाइकांची पत मोजणारी संस्था

### असोसिएटेड क्रेडिट ब्यूरो ऑफ अमेरिका

अमेरिकेंतील स्टोर्समधील विक्रीपैकी सुमारें ५८% विक्री उधारीनें होते. कोणाकडे किती रकमेपर्यंत उधारी ठेवावयाची, हें त्या स्टोर्सना कसें समजतें ?

असोसिएटेड क्रेडिट ब्यूरो ऑफ अमेरिका ह्या नांवाची तेथें एक संघटना आहे, तिचे १७५० सभासद-ब्यूरो आहेत. त्या सर्वांच्या मार्फत ती वैयक्तिक गिऱ्हाइकांच्या पतीबद्दल तपशील-वार नोंदणी करीत असते.

क्रेडिट ब्यूरो दररोज सुमारें ४,००० गिऱ्हाइकांच्या पतीबद्दल गुप्त माहिती दुकानदारांना पुरवीत असतो. लौकिक आणि प्राप्ती, याबरोबरच गिऱ्हाइक आपलें देणें कशा रीतीनें देतो, ह्या गोष्टीसहि महत्त्व असतें.

क्रेडिट ब्यूरोचे तपासनीस गिऱ्हाइक घरभाडें किती भरतो, तें वक्तशीर देतो का, एकाच जागीं किती दिवस राहिला आहे, त्याला मुलें किती आहेत (मुलें असणारे व विवाहित लोक आपली पत अधिक दक्षतेनें राखतात), शेजाऱ्यांच्या कांहीं तक्रारी आहेत का, इत्यादींची बारकाईनें चौकशी करून नोंदी करतात. त्याच्या बँकेंतील शिलकेची माहिती मिळवितात. बँकेंत पैसे भरणें व काढणें ह्यांची शिवाशिव चालू असेल, तर त्यानें पत वाढत नाहीं. चेक परत येत असतील, तर प्रश्नच मिटला !

पुष्कळ मालकांना नवा नोकर नेमतांना त्याच्या पार्श्वभूमीची माहिती हवी असते. नव्या जावयाबद्दलहि पालक चौकशी करतात. घटस्फोट घेण्याचा बेत चालू असणाऱ्या स्त्रियांचेबद्दल विशेष दक्षता बाळगावी लागते; कारण अनेक दुकानांतून त्या भरमसाठ खरेदी करून नवऱ्यावर त्याच्या बिलांची जबाबदारी टाकून त्याला सोडून निघून जातात.

न्यूयॉर्क सिटी हॉटेल असोसिएशन आपल्या सभासद हॉटेलांकडे दररोज माहितीपत्रक पाठवितात, त्यांत वाईट गिऱ्हाइकांचा तपशील दिलेला असतो. ह्या माहितीपत्रकाच्या प्रती क्रेडिट ब्यूरो, पोलीस, इत्यादींकडेहि धाडतात.

अशा रीतीनें, अमेरिकन नागरिकांच्या पतीची छाननी केली जाते. चांगली पत असणारांच्या व्यवहारांस सौकर्य येतें व त्यांना रोकड रकम मुळींच बाळगावी लागत नाहीं.

## सर्वांत महाग व स्वस्त रहाणीचें शहर

### एका अमेरिकन साप्ताहिकाची पहाणी

वॉशिंग्टन (यु. स्टेट्स) येथील रहाणीच्या खर्चाचा इंडेक्स नंबर १०० धरला, तर त्यामानानें मुंबईचा १११·४ होतो; म्हणजे, वॉशिंग्टन येथें रहाण्यापेक्षा मुंबईत रहाणें अधिक खर्चाचें आहे. सर्वांत महागाई कॅरॅकस (वेनेझुएला) ह्या शहरांत आहे; तेथील रहाणीच्या खर्चाचा इंडेक्स नंबर वॉशिंग्टनच्या मानानें १८७·२ होतो. इतर महागडी शहरें खालीलप्रमाणें आहेत:—

मॉन्ट्रिअल (१०८·१), लिस्बन (११०·२), अंकारा (१७६·४), पॅरिस (१४०·९), हवाना (१४५·४), लंडन (१०७·३), मनिला (१५७·३).

ला पाझ (बोलिव्हिया) येथील इंडेक्स नंबर फक्त ३६·७ आहे; म्हणजे त्या शहरांत सर्वांत जास्त स्वस्ताई आहे. तें शहर समुद्रसपाटीपासून १२,५०० फूट उंच असल्यानें, नव्यानें तेथें जाणाऱ्याला प्रथम विरळ हवेमुळें फारच त्रास होतो.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

### शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.



# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | पन्नास लक्ष रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | पंचवीस लक्ष रु. |
| वसूल भांडवल | साडेबारा लक्ष रु. |

संचालक मंडळ :

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., अध्यक्ष
२. डॉ. ना. मि. परुळेकर, एम्. ए., पीएच्. डी.
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम ऊर्फ बाळासाहेब नाईक

मुख्य ऑफिस :—४५५ रविवार पेठ, पुणें २

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें १. (२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४. (३) सोलापूर (४) सांगली.

मुख्य ऑफिस व सांगली येथें माफक भाड्यांत सेफ-डिपॉझिट लॉकरची सोय. खातेदारांना भाड्यांत सवलत.

सदाशिव पेठ व डेक्कन जिमखाना शाखांच्या कामाच्या वेळा सकाळ-सायंकाळ आहेत.

व्याज—चालू ठेव अर्धा टक्का. ★ सेव्हिंग्ज—दीड टक्का

तीन महिन्यांपासूनच्या मुदतठेवीवर ३ टक्के व्याज.

गो. गं. राजे, मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.